# Alumni Registration Certificate

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

Scanned by CamScanner

सत्यमेव जयते

# नोंदणीचे प्रमाणपत्र

(संस्था नोंदणी अधिनियम,१८६०)

(१८६० चा अधिनिअयम २१)

नोंदणी क्रमांक : **कोल्हापूर/0000512/2018**

याद्वारे असे प्रमाणित करण्यात येते की, **विट्ठलराव पाटील महाविद्यालय माजी विद्यार्थी वेलफॅर असोसिएशन कळे तालुका पन्हाळा जिल्हा कोल्हापूर**

खालील तारखेस संस्था नोंदणी अधिनियम, १८६० (सन १८६० चा अधिनियम २१) अन्वये योग्यरीत्या नोंदणी करण्यात आली.

तारीख 20 November 2018 रोजी माझ्या सहीनिशी दिले.

# Certificate of Registration

(The Societies Registration Act, 1860)

(Act XXI of 1860)

Registration Number: **Kolhapur/0000512/2018**

It is certified that, **Vitthalrao Patil mahavidhyalay maji vidyarthi welfare association Kale taluka Panhala dist Kolhapur** has this day been duly registered under the Societies Registration Act,1860 (XXI of 1860)

Given under my hand this 20 Day of November 2018.

ASSISTANT REGISTRAR OF SOCIETIES KOLHAPUR AREA

20-11-18

Assistant Registrar of Society,
सहाय्यक संस्था निबंधक
कोल्हापूर क्षेत्र

**I/C PRINCIPAL**
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

Scanned by CamScanner

**//परिशिष्ट - अ //**

दिनांक :- ३०/७/२०१६

प्रति,
महाध्यक्ष, संस्था निबंधक,
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर.

विषय :- <u>संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये नोंदणीबाबत</u>

संस्थेचे/मंडळाचे नांव व पत्ता :-**''विठ्ठलराव पाटील महाविद्यालय माजी विद्यार्थी वेल्फेअर असोसिएशन, कळे, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर''**

महोदय,

निवेदन करण्यात येते की, विषयात नमूद केलेल्या संस्थेची नोंदणी संस्था नोंदणी अधिनियम १८६० प्रमाणे करावयाची आहे. सबब आपणांकडे खालीलप्रमाणे कागदपत्र सादर करण्यात येत आहेत.

१) विधानपत्र (ज्ञापन) (मेमोरॅन्डम ऑफ असोसिएशन)
२) नियम व नियमावलीची सत्य प्रत (आर्टीकल्स ऑफ असोसिएशन)
३) संस्था नोंदणी संदर्भात कार्यकारी मंडळाचे सर्व सभासदांचे संमतीपत्र.
४) संस्था नोंदणीबाबत कार्यकारी मंडळाच्या सर्व सभासदांच्या सहीनिशी अधिकार पत्र.
५) संस्थेच्या पत्त्याबाबत व मालमत्तेबाबत अध्यक्ष वा सेक्रेटरी यांचे प्रतिज्ञापत्र रू.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर रू.५/- च्या कोर्ट फी स्टॅम्पसह.
६) अनुसूची एक (नियम ७)
७) अनुसूची दोन (नियम ८)
८) अनुसूची सहा (नियम १५)
९) संमतीपत्र (१९५०)
१०) संस्थेच्या स्थापनेबाबतच्या ठरावाची सत्य प्रत.
११) हमी पत्र
१२) प्रथम कार्यकारिणीची यादी
१३) संस्थेच्या पत्त्याबाबत जागा मालकाचे ना-हरकत प्रमाणपत्र.
१४) सर्व सभासदांचे ओळखपत्र व पत्त्याचा पुरावा.

पुढे असेही निवेदन करण्यात येते की, वरील संस्थेचे उद्देश सन १८६० च्या संस्था नोंदणी अधिनियमांच्या कलम २० अन्वये असून वरील संस्थेच्या नावाची किंवा नामसादृश्य असलेली संस्था माझे माहितीप्रमाणे अस्तित्वात नाही. नोंदणी शुल्क रू.५०/- (रूपये पन्नास मात्र) भरण्यास तयार आहे. तरी वरील संस्था, संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये त्वरीत नोंदवावी अशी विनंती आहे.

कळावे,

आपला विश्वासू,

-------------------
श्री. विजयकुमार शंकर पाटील
अध्यक्ष

**I/C PRINCIPAL**
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

Scanned by CamScanner

//परिशिष्ट - ३ //

"विठ्ठलराव पाटील महाविद्यालय माजी विद्यार्थी वेल्फेअर असोसिएशन, कळे, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर"

// ज्ञापन //

(मेमोरॅण्डम ऑफ असोसिएशन)

१) संस्थेचे नांव: "विठ्ठलराव पाटील महाविद्यालय माजी विद्यार्थी वेल्फेअर असोसिएशन, कळे, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर"

२) संस्थेच्या कार्यालयाचा पत्ता :- द्वारा - श्री.विजयकुमार शंकर पाटील, घर नं.४८/२, सावर्डे तर्फे असंडोली, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर

३) संस्थेचे उद्देश :-

१) माजी विद्यार्थ्यांसाठी कल्याणकारी योजना उपक्रम राबविणे.

२) गरीब विद्यार्थ्यांना शिक्षणाकामी शिष्यवृत्ती मिळणेबाबत सर्वतोपरी प्रयत्न करणे, मार्गदर्शन करणे.

३) हुशार व गरीब विद्यार्थ्यांना त्यांच्या शिक्षणासाठी मदत करणे.

४) रक्तदान, आरोग्य शिबीर घेणे.

५) लायब्ररीमध्ये अभ्याकरिता सोय करणे.

६) जे विद्यार्थी निराधार किंवा दिव्यांग आहेत अशां विद्यार्थ्यांना मदत करणे.

७) भागातील मुलांना तसेच मुलींना शिक्षणाची आवड निर्माण होवून ते एक आदर्श नागरीक व्हावेत यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणे.

८) लोकांमध्ये/विद्यार्थ्यामध्ये देशप्रेम, शिस्त,राष्ट्रीय एकता, सर्वधर्मसमभाव वृत्ती, आपआपसामध्ये स्नेहाची भावना आदी गुणांची जोपासना व्हावी यासाठी प्रयत्न करणे.

९) विद्यार्थ्यासाठी मैदानी खेळांच्या स्पर्धाचे आयोजन करणे.

१०) माजी विद्यार्थांना त्यांचे शिक्षण, नोकरी, प्रवेश इ.कामी येणाऱ्या अडीअडचणी दूर करणेचा प्रयत्न करणे व मार्गदर्शन करणे.

११) माजी विद्यार्थांना स्वयंरोजगाराचे महत्व पटवून देवून निरनिराळे कोर्सेस शिष्यवृत्या, व्यवसाय, याबाबत मार्ग दर्शन करणेचा प्रयत्न करणे.

१२) राष्ट्रीय व सांस्कृतिक सण (उदा.१५ ऑगष्ट, २६ जानेवारी, थोर व्यक्तींच्या जयंत्या/पुण्यतिथ्या इ. साजरे करणे.) थोर लोकांच्या जयंत्या साजऱ्या करून व्याख्यानमाला सुरु करणे.

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

अध्यक्ष | उपाध्यक्ष | सेक्रेटरी | खजानिस

Scanned by CamScanner

४) "विठ्ठलराव पाटील महाविद्यालय माजी विद्यार्थी वेल्फेअर असोसिएशन, कळे, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर"या संस्थेच्या नियम व नियमावली नुसार या संस्थेची व्यवस्था ज्या पहिल्या कार्यकारी मंडळ सदस्यांवर सोपविणेत आलेली आहे. अशा या संस्थेच्या पहिल्या कार्यकारी मंडळ सदस्यांची नांवे, पत्ते, हुद्दा, वय, व्यवसाय, राष्ट्रीयत्व इत्यादी तपशिल पुढील प्रमाणे :-

| अ.नं. | सदस्यांचे संपूर्ण नांव व पत्ता | हुद्दा | वय | राष्ट्रीयत्व | व्यवसाय |
|---|---|---|---|---|---|
| १) | श्री. विजयकुमार शंकर पाटील<br>रा.सावर्डे तर्फे असंडोली,पो.कळे,ता.पन्हाळा,जि.कोल्हापूर | अध्यक्ष | ३४ | भारतीय | शेती |
| २) | श्री. सचिन निवृत्ती पाटील<br>रा.चिंचवडे,पो.भामटे,ता.करवीर,जि.कोल्हापूर | उपाध्यक्ष | ३३ | भारतीय | शेती |
| ३) | श्री. दत्तात्रय हरी नाईक<br>रा.कळे,खडकाव गल्ली,कळे,ता.पन्हाळा,जि.कोल्हापूर | सचिव | ३१ | भारतीय | शेती |
| ४) | श्री. कृष्णात शामराव शेवाळे<br>रा.वाघुर्डे,पो.कळे,ता.पन्हाळा,जि.कोल्हापूर | खजिनदार | ३१ | भारतीय | शेती |
| ५) | श्री. दिग्वीजय हंबीरराव पाटील<br>रा.तुकाई गल्ली,कळे,ता.पन्हाळा,जि.कोल्हापूर | सदस्य | ३१ | भारतीय | शेती |
| ६) | श्री. राहूल शिवाजी सुतार<br>रा.आकुर्डे,पो.सुळे,ता.पन्हाळा,जि.कोल्हापूर | सदस्य | २६ | भारतीय | विद्यार्थी |
| ७) | श्री. विवेक संपतराव पाटील<br>रा.आंबेडकर बोळ,कळे,ता.पन्हाळा,जि.कोल्हापूर | सदस्य | २२ | भारतीय | विद्यार्थी |
| ८) | कु. दिपाली कृष्णात पाटील<br>रा.नविन वसाहत,कळे,ता.पन्हाळा,जि.कोल्हापूर | सदस्य | २९ | भारतीय | गृहिणी |
| ९) | कु. प्रियांका विलास पाटील<br>रा.वरची गल्ली,हरपवडे,पणुत्रे,ता.पन्हाळा,जि.कोल्हापूर | सदस्य | २३ | भारतीय | विद्यार्थी |
| १०) | सौ. पुनम ज्ञानेश्वर जाधव<br>रा.नेजदार गल्ली,चिंचवडे तर्फे कळे,ता.करवीर,जि.कोल्हापूर | सदस्य | २७ | भारतीय | विद्यार्थी |
| ११) | सौ. शारदा संभाजी खोत<br>रा.खोत गल्ली,माळवाडी,कोतोली,ता.पन्हाळा,जि.कोल्हापूर | सदस्य | ३३ | भारतीय | गृहिणी |

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

अध्यक्ष | उपाध्यक्ष | सेक्रेटरी | खजानिस

Scanned by CamScanner

५) आम्ही खालील सहया करणारे **''विठ्ठलराव पाटील महाविद्यालय माजी विद्यार्थी वेल्फेअर असोसिएशन, कळे, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर''** या संस्थेच्या नियम व नियमावली या संस्थेचे सदस्य जाहीर करतो की, संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये अभिप्रेत केलेली संस्था अस्तित्वात आणण्याची आमची इच्छा असून वरील उद्देशाने आम्ही एकत्र येवून **''विठ्ठलराव पाटील महाविद्यालय माजी विद्यार्थी वेल्फेअर असोसिएशन, कळे, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर''** ही संस्था दि. १०/११/२०१८ इ.रोजी स्थापन केली असून ती संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये नोंदणी करण्यासाठी आम्ही या विधानपत्रावर सहया केल्या आहेत.

| अ.नं. | सदस्यांचे संपूर्ण नांव | | सहया |
|---|---|---|---|
| १) | श्री. विजयकुमार शंकर पाटील<br>रा.सावर्डे तर्फ असंडोली,पो.कळे,ता.पन्हाळा,जि.कोल्हापूर | अध्यक्ष | |
| २) | श्री. सचिन निवृत्ती पाटील<br>रा.चिंचवडे,पो.भामटे,ता.करवीर,जि.कोल्हापूर | उपाध्यक्ष | |
| ३) | श्री. दत्तात्रय हरी नाईक<br>रा.कळे,खडकाव गल्ली,कळे,ता.पन्हाळा,जि.कोल्हापूर | सचिव | |
| ४) | श्री. कृष्णात शामराव शेवाळे<br>रा.वाघुर्डे,पो.कळे,ता.पन्हाळा,जि.कोल्हापूर | खजिनदार | |
| ५) | श्री. दिग्वीजय हंबीरराव पाटील<br>रा.तुकाई गल्ली,कळे,ता.पन्हाळा,जि.कोल्हापूर | सदस्य | |
| ६) | श्री. राहूल शिवाजी सुतार<br>रा.आकुर्डे,पो.सुळे,ता.पन्हाळा,जि.कोल्हापूर | सदस्य | |
| ७) | श्री. विवेक संपतराव पाटील<br>रा.आंबेडकर बोळ,कळे,ता.पन्हाळा,जि.कोल्हापूर | सदस्य | |
| ८) | कु. दिपाली कृष्णात पाटील<br>रा.नविन वसाहत,कळे,ता.पन्हाळा,जि.कोल्हापूर | सदस्य | |
| ९) | कु. प्रियांका विलास पाटील<br>रा.वरची गल्ली,हरपवडे,पणुत्रे,ता.पन्हाळा,जि.कोल्हापूर | सदस्य | |
| १०) | सौ. पुनम ज्ञानेश्वर जाधव<br>रा.नेजदार गल्ली,चिंचवडे तर्फ कळे,ता.करवीर,जि.कोल्हापूर | सदस्य | |
| ११) | सौ. शारदा संभाजी खोत<br>रा.खोत गल्ली,माळवाडी,कोतोली,ता.पन्हाळा,जि.कोल्हापूर | सदस्य | |

वरील सहया करणाऱ्या सर्व व्यक्तींना मी ओळखतो. त्यांनी माझ्या समक्ष वरील विधानपत्रावर सह्या केल्या आहेत.

शिक्का
(वकील/चार्टर्ड अकौटंट/नोटरी)

विशेष कार्यकारी अधिकारी
कोल्हापूर

सही :-
नांव :-
पत्ता :-

आयु. अप्पासिंग गणपती जाधव
विशेष कार्यकारी अधिकारी
यवलूज ता पन्हाळा जि कोल्हापूर

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

अध्यक्ष उपाध्यक्ष सेक्रेटरी खजानिस

Scanned by CamScanner

**//परिशिष्ट -क//**

**''विठ्ठलराव पाटील महाविद्यालय माजी विद्यार्थी वेल्फेअर असोसिएशन, कळे, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर''**

**या संस्थेची नियम व नियमावली (मेमोरॅण्डम ऑफ असोसिएशन)**

(१) नियमावलीतील संदर्भीय शब्दांची व्याख्या :-

अ) संस्था यांचा अर्थ **''विठ्ठलराव पाटील महाविद्यालय माजी विद्यार्थी वेल्फेअर असोसिएशन, कळे, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर''**ही संस्था असा समजावा. कायद्याप्रमाणे याचा अर्थ सोसायटीज् रजिस्ट्रेशन ॲक्ट १८६०/मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० अन्वये समजावा.

ब) अध्यक्ष म्हणजे **''विठ्ठलराव पाटील महाविद्यालय माजी विद्यार्थी वेल्फेअर असोसिएशन, कळे, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर''**या संस्थेचा अध्यक्ष समजावा.

क) उपाध्यक्ष म्हणजे **''विठ्ठलराव पाटील महाविद्यालय माजी विद्यार्थी वेल्फेअर असोसिएशन, कळे, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर''**या संस्थेचा उपाध्यक्ष समजावा.

ड) सचिव/सेक्रेटरी म्हणजे **''विठ्ठलराव पाटील महाविद्यालय माजी विद्यार्थी वेल्फेअर असोसिएशन, कळे, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर''**या संस्थेचा सचिव समजावा.

इ) खजिनदार म्हणजे **''विठ्ठलराव पाटील महाविद्यालय माजी विद्यार्थी वेल्फेअर असोसिएशन, कळे, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर''**या संस्थेचा खजिनदार समजावा.

(फ) कार्यकारिणी सदस्य/कार्यकारी विश्वस्त म्हणजे **''विठ्ठलराव पाटील महाविद्यालय माजी विद्यार्थी वेल्फेअर असोसिएशन, कळे, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर''**या संस्थेचा कार्यकारिणी सदस्य/कार्यकारी विश्वस्त समजावा.

ग) सभासद म्हणजे या नियमावलीतील नियम क्रमाक ४ नुसार**''विठ्ठलराव पाटील महाविद्यालय माजी विद्यार्थी वेल्फेअर असोसिएशन, कळे, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर''**या संस्थेचा सभासद समजावा.

---

(२) कार्यक्षेत्र :- संस्थेचे कार्यक्षेत्र हे **महाराष्ट्र राज्य** मध्ये मर्यादित राहील.

---

(३) हिशोबाचे वर्ष :- संस्थेचे हिशोबाचे वर्ष हे १ एप्रिल रोजी सुरू होऊन प्रत्येक वर्षाच्या ३१ मार्चला समाप्त होईल.

---

(४) सभासदत्व व त्याची नोंदणीची पध्दत :-

संस्थेचे ध्येय, धोरण व दृष्टीकोन मान्य असलेल्या, संस्थेची नियम व नियमावलीनुसार वागण्यास तयार असणाऱ्या विठ्ठलराव पाटील महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यास या संस्थेचा सभासद होता येईल. संस्थेची वार्षिक वर्गणी रू.१००/-(रूपये शंभर)इतकी राहील. संस्थेचा सभासद होवू इच्छिणाऱ्या व्यक्तीने संस्थेने ठरविलेल्या नमुन्याच्या फॉर्ममध्ये माहिती भरून कार्यकारी मंडळातील दोन सभासदांच्या शिफारशीनुसार त्यांच्या सह्यानिशी घेवून सदरचा अर्ज कार्यकारी मंडळाच्या सभेत २/३(दोन तृतिआंश)मताने मंजूर झाल्यास त्या व्यक्तीस या संस्थेच्या सभासदत्त्वाचे सर्व हक्क प्राप्त होतील. संस्थेची वार्षिक सभासद वर्गणी न भरलेल्या सभासदांचे सभासदत्त्व रद्द करणेत येईल.

---

(५) सभासदत्व रद्द होणे :- **खाली नमुद केलेप्रमाणे अनेक कारणांनी सभासदत्त्व रद्द होऊ शकते.**

* नियमानुसार मासिक/वार्षीक वर्गणी न दिल्यास किंवा सलग ३ महिने फी न भरल्यास सभासदत्त्व रद्द करणेत येईल.

* सभासदाची वर्तुणुक/वागणूक संस्थेच्या कार्यास घातक ठरत असेल, ज्ञापन/नियमावलीतील तरतुदींचे उल्लंघन करित असेल, निर्घुण कृत्य केल्यास, संस्थेस हानी/नुकसान होईल, अप्रतिष्ठा दुलौकीक होण्यास कारणीभूत ठरेल असे कृत्य केल्यास अशा सभासदांचे सभासदत्त्व रद्द करण्यात येईल. अफरातफर अथवा संस्थेची फसवणूक केल्यास, संस्थेविषयी अप्रचार केल्यास अथवा संस्थेस तोषिस लागेल असे कृत्य केल्यास अशा सभासदांचे सभासदत्त्व रद्द करण्यात येईल.

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

अध्यक्ष उपाध्यक्ष सेक्रेटरी खजिनदार

Scanned by CamScanner

* फौजदारी खटल्यास दोषी ठरून कायदेशीर शिक्षापात्र ठरल्यास, कायद्यानुसार दिवाळखोर सिध्द झाल्यास सभासदत्त्व रद्द करण्यात येईल.
* संस्थेचे काम करण्यास-कायदेशीर अपात्र ठरविले असल्यास, लेखी स्वरुपात राजीनामा दिलेला असेल आणि राजीनामा मंजूर झाला असेल तर सभासदत्त्व रद्द करणेत येईल.
* वैद्यकीय शारिरीक/मानसीक दृष्टया संस्थेचे काम करण्यास असमर्थ असल्यास, मृत्यु अथवा अन्य कारणाने सभासदत्त्व रद्द करणेत येईल.

सभासदत्त्व रद्द करण्याबाबतचे निर्णय कार्यकारी मंडळ बहुमताने घेईल.

---

(६) **सभासदांचे प्रकार :**

**अ) संस्थापक सभासद :-**

जे सभासद संस्था स्थापन करणेस कारणीभूत होती तसेच त्यांनी संस्थेने ठरवून दिलेली वार्षिक वर्गणी रू.१००/- (अक्षरी रूपये शंभर फक्त) व प्रवेश फी रू.५०/- इतकी भरतील अशा सभासदांना संस्थापक सभासद म्हटले जाईल.तसेच अशा सभासदांना संस्थेच्या कार्यकारी मंडळ निवडणूकीत भाग घेता येईल.

**ब) सामान्य सभासद :-**

जे सभासद संस्थेची वार्षिक वर्गणी रूपये १००/- (रूपये शंभर) वेळचेवेळी देतील अशा सभासदांना सामान्य सभासद असे म्हटले जाईल. वार्षिक वर्गणीच्या ह्या रक्कमेत बदल करणेचा अधिकार सर्वसाधारण सभेच्या अनुमतीने कार्यकारिणीस राहील. अशी जमा झालेली वर्गणी कोणत्याही परिस्थितीत परत दिली जाणार नाही.तसेच अशा सभासदांना संस्थेच्या कार्यकारी मंडळ निवडणूकीत भाग घेता येईल.

**क) आजीव सभासद :-**

जी व्यक्ती संस्थेस रूपये १०००/- (रूपये एक हजार फक्त) देईल अशा व्यक्तीस या संस्थेचा आजीव सभासद असे म्हटले जाईल. अशा सभासदांना संस्थेची प्रवेश फी व वार्षिक वर्गणी यांची अट लागू रहाणार नाही. तसेच अशा सभासदांना संस्थेच्या कार्यकारी मंडळ निवडणूकीत भाग घेता येईल.

---

(७) **वार्षीक सर्वसाधारण सभा व तिची कार्ये :-**

वार्षीक सर्वसाधारण सभा ही संस्थेची सर्वश्रेष्ठ व अंतीम निर्णय देणारी सभा समजली जाईल. ही सभा वर्षामध्ये माहे एप्रिल ते जुलै या कालावधीतच घेतली पाहिजे. या सभेत सर्व प्रकारचे विद्यमान सभासद भाग घेऊ शकतील. सभेचे स्थळ, दिनांक, वेळ, गणसंख्या, अजेंडा या बाबची सुचना सर्वांना सभेच्या किमान १५ दिवस अगोदर देणे आवश्यक राहील.

* सभेचे मागील इतिवृत्त वाचून कायम करणे/मान्यता देणे.
* कार्यकारी मंडळाने चालविलेल्या कारभारावर नियंत्रण ठेवणे.
* वार्षीक हिशोब/जमा खर्च मंजूर करणे.
* पुढील वर्षाचे अंदाजपत्रकास मंजुरी देणे.
* वेळेवर येणाऱ्या ठरावावर नियंत्रण ठेवणे, संस्थेपुढील गहन व महत्त्वाच्या विषयांवर चर्चा करणे व निर्णय घेणे.
* सनदी लेखापालाची निवड करून त्याचे मानधन ठरविणे, इत्यादी या सभेचे कार्ये असतील.

---

(८) **सर्वसाधारण सभा, सुचना व गणसंख्या :-**

सर्वसाधारण सभेचे स्थळ, दिनांक, वेळ, गणसंख्या, अजेंडा या बाबतची सुचना सर्वांना सभेच्या किमान १५ दिवस अगोदर देणे आवश्यक राहील. सभेची सुचना किमान १५ दिवस अगोदर अध्यक्षांच्या संमतीने सचिवाने सर्व प्रकारच्या सभासदांना देणे आवश्यक राहील. सुचनेमध्ये वरीलप्रमाणे माहिती तसेच सभेपुढील विषय नमुद करावेत. सभेची सुचना हस्तेदेय किंवा नोटीसबुकावर सही-नोंद घेउन देता येईल अगर रजिस्टर टपालाद्वारे पाठविता येईल. एकूण सभासद संख्येच्या २/३ एवढे सभासद उपस्थित झाल्यास गणसंख्या पूर्ण झाली असे समजण्यात येईल. पुरेशी गणसंख्या न जमल्यास तहकूब/स्थगीत सभेला पुन्हा गणसंख्येचे बंधन राहणार नाही. पुरेशा गणसंख्ये अभावी स्थगीत सभा पुन्हा अर्ध्या तासाने त्याच ठिकाणी घेण्यात येईल. मात्र अशा सभेत घेण्यात आलेला निर्णय सर्वांवर बंधनकारक असेल. परंतू अशी सुचना नमुद असणे आवश्यक आहे.

---

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

अध्यक्ष | उपाध्यक्ष | सेक्रेटरी | खजानिस

Scanned by CamScanner

**विशेष सर्वसाधारण सभा व तिची कार्ये :-**

विशेष सर्वसाधारण सभा आवश्यकते नुसार केव्हाही घेता येईल. जी कार्ये वार्षिक सर्वसाधारण सभा करूशकते अशी सर्व कार्ये करण्याचा अधिकार विशेष सर्वसाधारण सभेला असेल. संस्थेच्या सभासदांची विशेष सर्वसाधारण सभा अध्यक्षांच्या संमतीने कार्यकारी मंडळ आयोजित करेल. किंवा सभासद संख्येच्या ३/५ सभासदांनी कार्यकारी मंडळाकडे लेखी मागणी केल्यास - कार्यकारी मंडळाने तशी मागणी मिळाले पासुन ३० दिवसांचे आंत विशेष सर्वसाधारण सभा बोलवतील/आयोजित करतील. विशेष सर्वसाधारण सभेसाठी मतदानाचा हक्क असलेल्या एकूण ३/५ सभासदांची गणसंख्या असेल. सुचनेमध्ये वरील प्रमाणे माहिती तसेच सभेपुढील विषय नमुद करावेत. पुरेशी गणसंख्या न जमल्यास त्याच विषयाच्या सदर तहकूब/स्थगीत सभेला पुन्हा गणसंख्येचे बंधन राहणार नाही. पुरेशा गणसंख्ये अभावी स्थगीत सभा पुन्हा अर्ध्या तासाने त्याच ठिकाणी घेण्यात येईल. मात्र अशा सभेत घेण्यात आलेला निर्णय सर्वांवर बधंनकारक असेल.

---

**(१०) संस्थेचे कार्यकारी मंडळ व त्याची रचना :-**

संस्थेचे कार्य, व्यवहार पाहणेसाठी कार्यकारी मंडळ/विश्वस्त मंडळ असेल, यामध्ये कमीतकमी ११ सदस्य असतील. त्यांची रचना पुढील प्रमाणे राहील. १. अध्यक्ष, २. उपाध्यक्ष, ३ खजिनदार, ४.सेक्रेटरी/सचिव, ५ ते ११ हे कार्यकारी सदस्य/विश्वस्त असतील.आवश्यक वाटल्यास कार्यकारी मंडळ सदस्य संख्या १३(तेरा) पर्यंत वाढविणेचा अधिकार कार्यकारी मंडळास राहील.

---

**(११) कार्यकारी मंडळाचा कार्यकाल व निवडणूकीची पद्धत :-**

कार्यकारी मंडळाचा कार्यकाल हा ५ वर्षाचा राहील. कार्यकारी मंडळाची निवड सर्वसाधारण सभेमध्ये दर ५ वर्षांनी बहुमताने केले जाईल.

---

**(१२) कार्यकारी मंडळाचे पदाधिकारी व त्यांची कार्ये/जबाबदारी :-**

अ. **अध्यक्ष**

१. संस्थेच्या अध्यक्षांनी संस्थेच्या सभांचे अध्यक्षस्थान भुषवावे व नियंत्रण करावे.
२. संस्थेच्या सर्व सभांचे कामकाज नियम व नियमावलीनुसार संस्था हितार्थ चालवावे.
३. संस्थेच्या कारभारावर व त्यांच्या विविध शाखांवर नियंत्रण ठेवणे.
४. संस्थेच्यावतीने रक्कमेची देवाण-घेवाण करणे.
५. संस्थाहितार्थ विविध करार करणे.
६. सभासदांचा राजिनामा मंजूर करणेबाबत अंतिम अधिकार अध्यक्षांना राहिल.
७. मतांची बरोबरी झाल्यास जास्तीचे मत/निर्णायक मत देण्याचा अधिकार अध्यक्षांनी बजवावा.
८. संस्था हितार्थ सर्व अंतीम अधिकार अध्यक्षांना असतील.

ब. **उपाध्यक्ष**

१. संस्थेच्या अध्यक्षांच्या आदेशांचे पालन उपाध्यक्षांनी करावे.
२. संस्थच्या कार्यात अध्यक्षांना मदत करणे.
३. अध्यक्षांच्या अनुपस्थितीत/गैरहजेरीत अध्यक्षांना असलेले सर्वाधिकार वापरून संस्थाहितार्थ संस्थेचे कामकाज चालवावे.
४. अध्यक्षांच्या अनुपस्थितीत/गैरहजेरीत संस्थेच्या सभांचे अध्यक्षस्थान भुषवावे व नियंत्रण करावे.

क. **सचिव/सेक्रेटरी**

१. सचिव/सेक्रेटरी यांनी अध्यक्षांच्या आदेशांचे पालन करावे.
२. संस्थेच्या सर्व सभा आयोजित करणे, तसेच प्रत्येक सभेचे इतिवृत्त, कार्यवृत्त हे इतिवृत्त नोंदवहीमध्ये सुवाच्च अक्षरात सुस्पष्ट लिहावे व पुढील सभेत ते वाचून दाखवावे.
३. संस्थेच्या नांवे सर्व अधिकृत पत्रव्यवहार करावा.
४. विविध कार्यसुची तयार करावी.

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala. Dist. Kolhapur

अध्यक्ष | उपाध्यक्ष | सेक्रेटरी | खजानिस

Scanned by CamScanner

५. संस्थेचे कर्मचारी म्हणून विविध पदांवर नेमणुका करणे, नोकरीतून काढून टाकणे, संस्थेच्या कर्मचाऱ्यांसाठी नियम तयार करावेत, त्यांचेवर लक्ष ठेवणे.

६. संस्थेचे कोर्ट कचेरीचे कामकाज पाहणे.

७. संस्थेच्या वतीने रक्कमेची देवाण-घेवाण करणे. आवश्यकतेनुसार अध्यक्षांच्या लेखी परवानगीने संस्थेचे रू.३००/- पर्यंतची रक्कम आकस्मीतक खर्चासाठी आपल्या हाती ठेवावी.

८. वार्षीक हिशोब पत्रके व इतर महत्त्वाची विवरणपत्रके, महत्त्वाचे अहवाल वेळोवेळी तयार करवून घेणे व संबंधीत विभागांकडे विहीत वेळेत सादर करणे.

९. कार्यकारी मंडळाचे संमत्तीने किरकोळ नियम तयार करणे.

१०. संस्थेच्या मोठ्या खर्चाची बिले मंजूर करणे, मालमत्तेची देखरेख करणे.

११. संस्थेच्या आर्थिक परिस्थितीवर नियंत्रण ठेवणे.

१२. अध्यक्ष व उपाध्यक्ष यांच्या अनुपस्थितीत संस्थेच्या सभांचे अध्यक्षपद स्विकारून संस्था हितार्थ कामकाज चालविणे.

ड. <u>खजानीस</u>

१. खजिनदार यांनी अध्यक्षांच्या आदेशांचे पालन करावे.

२. वार्षीक हिशोब पत्रके व इतर महत्त्वाची विवरणपत्रके तयार करणे व संबंधीत विभागांकडे विहीत वेळेत सादर करणे.

३. संस्थेच्या खर्चाची बिले मंजूर करणे, पावत्यांवर सह्या करणे, मालमत्तेची देखरेख करणे, मोठ्या खर्चाची बिले सचिवांच्या संयुक्त सहीने मंजुर करणे. संस्थेच्या आर्थिक परिस्थितीवर नियंत्रण ठेवणे.

४. संस्थेच्या जमा खर्चाचे हिशोब ठेवणे व त्यासंबंधीच्या नोंदवह्या सुस्थितीत ठेवणे.

५. संस्थेच्या नावे जमा झालेल्या रक्कमेपकी जास्तीत जास्त रक्कम त्याच दिवशी सायंकाळ पर्यंत अथवा दुसरे दिवशी सकाळी संस्थेच्या नांवे असलेल्या बँक खात्यात जमा करावी.

६. खजिनदाराने सभासदांची सुची तयार करून त्यांचे वर्गणीचा हिशोब व्यवस्थित व अद्ययावत ठेवावा.

७. संस्थेच्या नांवे वेळोवेळी येणाऱ्या कोणत्याही रक्कमा, वर्गणी, देणग्या, प्रवेश शुल्क, निधी, चिजवस्तू वगैरे स्विकाराव्यात आणि त्याबाबत छापिल अनुक्रमांकीत, संस्थेचा नोंदणी क्रमांक व कार्यालयाचा पत्ता असलेल्या पावत्या द्याव्यात.

८. लेखापरिक्षकांनी काढलेल्या त्रूटींची त्वरीत पूर्तता करणे.

इ) <u>कार्यकारी सदस्य</u>

१. सर्व कार्यकारी सदस्यांनी अध्यक्षांच्या आदेशांचे पालन करावे व सचिवांना त्यांचे कार्यात परवानगी नुसार आवश्यकते प्रमाणे मदत करावी.

२. सर्व सभांमध्ये उपस्थित राहणे.

३. संस्थेच्या कामकाजावर लक्ष ठेवणे.

४. निवडणूकीस मतदान करणे.

५. संस्थेस सुयोग्य निर्णय घेण्यास/योग्य निर्णय पारित करण्यास मदत करणे.

६. संस्थेचे नांव, कार्य सर्वसामान्यांपर्यंत पोहचविणे कामी सर्व कामे करणे.

संस्थेच्या सर्व कामकाजासाठी/निर्णयासाठी कार्यकारी मंडळातील सर्व विश्वस्त जबाबदार असतील.

---

(१३) <u>कार्यकारी मंडळाचे अधिकार व कर्तव्य</u> :-

* कार्यकारी मंडळ संस्थेच्या सर्व कारभाराचे नियंत्रण व संचालन करेल.
* कार्यकारी मंडळ संस्थेच्या सभांमध्ये पारित झालेल्या सर्व ठरावांची पुर्तता करेल/करवून घेईल.
* संस्थेच्या स्थावर, जंगम मालमत्तेवर लक्ष ठेवणे, देखरेख करणे, तसेच त्यांची विहित नमुन्यात नोंद ठेवणे.
* मा.सहाय्यक संस्था निबंधक/मा.सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांचेकडे विविध विवरण पत्रके, हिशोबपत्रके, रिपोर्ट विहीत वेळेत सादर करणे.
* संस्थेच्या हितार्थ कोर्ट कचेरीचे कामकाज करणे, न्यायालयात दावे दाखल करणे व संस्थेच्या हितासाठी कामकाज करणे, जाहिरात देणे, संस्थेवर असलेल्या कायदेशिर बाबींची पुर्तता करणे.

अध्यक्ष | उपाध्यक्ष | सेक्रेटरी | खजिनदार

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

Scanned by CamScanner

* संस्थेच्या हितामध्ये आवश्यक ते आदेश पारित करणे व योग्य ती पुर्तता करणे. विविध सेवा-संहितासाठी करार करणे.
* विविध रक्कमांची देवाण-घेवाण करणे.
* नियम व आवश्यकतेनुसार सुचना देऊन सभांचे आयोजन करणे.
* संस्थेच्या हितामध्ये आवश्यकतेनुसार नियम व नियमावलीच्या आणि उद्देशांच्या अधिन राहून नियम/ पोटनियम तयार करणे. आवश्यकतेनुसार त्यात बदल करणे.
* संस्थेच्या उद्देशपुर्तीसाठी विविध शाखांना मान्यता देणे/काढून घेणे, शाखा सुरू करणे, बंद करणे.
* तक्रारीची दखल घेणे, योग्य ते दिशानिर्देश देणे/माहिती देणे.
* हिशोबांवर, जमा-खर्चाच्या नोंदीवर नियंत्रण ठेवणे.
* आवश्यकतेनुसार स्थानिक समिती, उपसमिती नेमणे व काम पुर्ण होताच त्या बरखास्त करणे.
* सभासदत्त्वासाठीस आलेल्या योग्य नमुन्यातील अर्जावर विचार करून घेणे आणि अर्ज मंजूर/नामंजूर करणे.
* कार्यकारी मंडळातील रिक्त पदे भरणे बाबत/कार्यकाल पूर्ण झाला असल्यास नियमांनुसार तात्काळ कार्यवाही करणे. अचानक रिक्त झालेल्या पदांबाबत उरलेल्या कालावधीसाठी रिक्त पदे भरणे बाबत नियमांनुसार तात्काळ कार्यवाही करणे.
* संस्थेच्या कामकाजासाठी सेवकांची नियुक्ती करणे - त्यांना रितसर काढून टाकणे.
* संस्था हितार्थ बहुमताने विविध निर्णय घेणे.

---

(१४) <u>कार्यकारी मंडळाची सभा व मागणीची सभा</u> :-

* कार्यकारी मंडळाची सभा दोन महिन्यातून एकदा आयोजित करण्यात येईल.
* कार्यकारी मंडळाच्या संमतीशिवाय/परवानगीशिवाय ठोस कारण नसताना एखादा सभासद सतत ४ सभांना गैरहजर राहिल्यास विहीत सुचना देऊन त्यांचे कार्यकारी मंडळाचे सभासदत्त्व रद्द केले जाऊ शकते.
* कार्यकारी मंडळाची सभा नियम व नियमावली नुसार घेत नसल्यास कार्यकारी मंडळातील १/३ सभासदांनी स्वत: सहीनिशी अध्यक्ष/सचिव यांचेकडे अर्ज करून सभा भरविण्याची मागणी केली पाहिजे. अथवा संस्थेच्या एकूण सभासद संख्येच्या २/३ सभासदांनी लेखी मागणी केल्यास अध्यक्षांनी सदर मागणी प्राप्त झाल्याच्या दिनांकापासुन १५ दिवसांचे आत कार्यकारी मंडळाची सभा घ्यावी असे बंधन राहील. अध्यक्षांनी अशी सभा बोलावली नाही तर सचिवांकडे पून्हा अर्ज केल्यास सचिवांनी सदर सभा आयोजित करावी. या सभेला कार्यकारी मंडळाच्या सभेचे पुर्ण अधिकार असतील. सदर सभांच्या सुचनेमध्ये मागणीची सभा असे नमुद करणे आवश्यक आहे. कार्यकारी मंडळाची मागणीची सभा भरवून मागणी अर्जाप्रमाणे त्यावर निर्णय घेतला पाहिजे.

---

(१५) <u>कार्यकारी मंडळाची सभा व मागणीची सभेची सुचना व गणसंख्या</u> :

* कार्यकारी मंडळाच्या सर्व सभासदांना कार्यकारी मंडळाच्या सभेची लेखी सुचना सेक्रेटरी/सचिवाने कमीत कमी आठ दिवस अगोदर दयावी. सभेची सुचना व अजेंडा रजिस्टर पोस्टाने, नोंद घेऊन हस्तेदेय पाठविले जाऊ शकतात. तसेच सुचना कार्यालयाचे दर्शनी भागातील सुचना फलकावर लागणत येईल.
* सभेच्या सुचनामध्ये तारीख, वेळ, ठिकाण, नमुद असेल.
* कार्यकारी मंडळाच्या सभेत गणसंख्या (कोरम) ३/५(तीन पंचमांश) पदाधिकाऱ्यांची असेल. गणसंख्ये अभावी सभा तहकुब झाल्यास सदरील सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल. अशा सभेस गणसंख्येचे बंधन असणार नाही. तसेच सभेतील निर्णय बहुमताने घेण्यात येतील.

---

(१६) <u>कार्यकारी मंडळाचे निवडणूकीचे नियम</u> :-

कार्यकारी मंडळाची निवड दर ५ वर्षांनी, वरील नियम क्रमांक ४,६,१०,११ चे अनुसार सर्वसाधारण सभेत केली [illegible] कार्यकारी मंडळाची निवड झाल्यावर पहिल्या ७ दिवसानंतर अध्यक्षांच्या संमतीने कार्यकारी मंडळाची पहिली सभा [illegible] कार्यकारी मंडळाचे निवडणूकीस मान्यता देऊन हे कार्यकारी मंडळ कामकाजास सुरवात करेल. निवडणूकीची [illegible] मतदान पध्दतीने व पदाधिकाऱ्यांच्या बहुमताने केली जाईल.

---

अध्यक्ष | उपाध्यक्ष | सेक्रेटरी

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala. Dist. Kolhapur

Scanned by CamScanner

(१७) **कार्यकारी मंडळाचे रिक्त पद भरणेबाबत नियम :-**

नियमावलीत नमुद केलेल्या कारणावरून कार्यकारी मंडळातील रिक्त झालेली जागा भरावयाची असल्यास त्याबाबत कार्यकारी मंडळातील सभेत त्याची निवड करण्यात येईल. याबाबत वरील नियम क्रमांक ४,६,१०,११ विचारात घेण्यात येईल व नियोजित पदसंख्या सपुर्ण करून घेण्यात येईल व मा.सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांचेकडे त्याबाबतचा बदल अर्ज मान्यतेस्तव दाखल करेल. मात्र सहा महिन्यापेक्षा जास्त कालावधीसाठी कार्यकारी मंडळातील पद/पदे रिक्त राहील्यास ते पद भरण्याचा अधिकार मा.सहाय्यक/उप धर्मादाय आयुक्त यांना राहील.

---

(१८) **संस्थेचा निधी, मिळकती व विनियोग :-**

सभासद फी, वर्गणी, अनुदान, बँकेचे व्याज, प्रवेश शुल्क, देणगी, बक्षिस, दान, संस्थेच्या मालमत्ते पासून येणारे उत्पन्न हे उत्पन्नाचे प्रमुख स्त्रोत असतील. संस्थेच्या उद्देशपुर्ती साठी व त्यासाठीच्या प्रशासनिक कामकाजासाठी त्याचा विनियोग करण्यात येईल. तसेच संस्थेच्या उद्देशपुर्तीसाठी व हितासाठी स्थावर मिळकत विकत घेणे, हस्तांतरीत करणे, कराराने घेणेचा हक्क आहे. परंतू अशा स्थावर/जंगम मालमत्तेचा/मिळकतीचा विनियोग संस्थेच्या व सभासदांच्या हितासाठीच केला जाईल. आवश्यक त्या ठिकाणी मा.सहाय्यक/उप/सह/धर्मादाय आयुक्त यांची कायद्याप्रमाणे मंजूरी घेण्यात येईल.

---

(१९) **उद्दीष्ट निहाय खर्चाची तरतूद :-**

१. संस्थेचे ज्या उत्पन्नाच्या साधनांतुन फंड अथवा निधी जमा केला जाईल त्यातुन संस्थेवर असलेली जबाबदारी खर्च वजा जाता राहिलेल्या रक्कमेपैकी शिल्लक रक्कमेतुन उद्देशात नमुद केलेल्या कारणांसाठी खर्च करण्यात येईल.

२. शैक्षणिक व वैद्यकीय कारणांसाठी ३५%, तसेच विद्यार्थी वसतीगृह, धर्मशाळा, सुखसोई, शिष्यवृत्ती, फी तसेच वैद्यकीय उपचारांसाठी मदत यावर २५%स याप्रमाणे किंवा त्याचे मर्यादित खर्च करून राहीलेली रक्कम संस्थेच्या इतर उद्देशपुर्तीसाठी किंवा योग्य त्या कारणांवर खर्च करण्यात येईल.

३. आवश्यकतेनुसार सदर खर्चाच्या प्रमाणात कार्यकारी मंडळाच्या ठरावान्वये बहुमताने बदल केला जाऊस शकेल. मात्र ठरावामध्ये या बाबतची ठोस कारणे नमुद करावी लागतील.

---

(२०) **कर्ज किंवा ठेवी यासंबंधी तरतूद :-**

संस्थेला आवश्यक वाटल्यास कोणत्याही व्यक्ति/वित्तीय संस्थेकडून ठेवी घेणे अगर कर्ज घेण्यासाठी सर्वसाधारण सभेमध्ये ठराव बहुमताने मंजूर करावा लागेल. तद्नुसार संस्थेस हात-उसनवार रक्कमा घेता येतील, कर्ज घेता येईल, ठेवी स्विकारता येतील, तारण/गहाण ठेवता येईल. मात्र या बाबत मा.सहाय्यक/उप/सह/धर्मादाय आयुक्त यांची कायद्याप्रमाणे पुर्वपरवानगी आवश्यक राहील.

---

(२१) **स्थावर मालमत्ता खरेदी - विक्री करण्याबाबतची तरतूद :-**

संस्थेच्या हितासाठी, उद्देशपुर्तीसाठी संस्थेस स्थावर मालमत्तेची खरेदी करता येईल. सर्वसाधारण सभेमध्ये या बाबतचा ठराव बहुमताने पारीत करून त्याबाबत व्यवहार करता येईल. मात्र विक्रीबाबत मा.सहाय्यक/ उप/सह/धर्मादाय आयुक्त यांची कायद्याप्रमाणे पुर्वपरवानगी आवश्यक राहील.

---

(२२) **बँक खाते :-**

संस्थेजवळ असलेल्या ठेवी, शिल्लक रक्कम कोणत्याही राष्ट्रीयकृत अथवा अनुसुचीत शेड्युल्ड बँकेमध्ये त्या संस्थेचे अध्यक्ष, सचिव, खजिनदार या पदाधिकाऱ्यापैकी कोणत्याही दोन सदस्यांच्याच संयुक्त सहीने पैशाची देवाण-घेवाण करणे आवश्यक राहील. संस्थेचे शक्य तितके व्यवहार हे धनादेशाद्वारे करण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

---

(२३) **सभासदांची यादी :-**

संस्थेच्या प्रत्येक प्रकारच्या सभासदांची यादी संस्था नोंदणी अधिनियम १८६० मधील कलम १५ नुसार तसेच संस्था नोंदणी (महाराष्ट्र) नियम १९७१ मधील चे कलम १५ अन्वये अनुसूची ६ प्रमाणे ठेवण्यात येईल.

अध्यक्ष | उपाध्यक्ष | सेक्रेटरी | खजानिस

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

Scanned by CamScanner

तरेच संस्था नोंदणी अधिनियम १८६० मधील कलम ४ नुसार व सन १९७१ च्या संस्था नोंदणी (महाराष्ट्र) नियमांमधील नियम ८ नुसार दरवर्षी संस्थेमध्ये नोकरीस लावलेल्या व्यक्तींच्या नोकरी संबंधी अटी बाबतचे विवरण संबंधीत अनुसूची २ च्या नमुन्यात मा.सहाय्यक संस्था निबंधक यांचे कार्यालयास पाठवावी लागेल.

---

**(२४) <u>ज्ञापन, नियम व नियमांवलीतील बदल करण्याची तरतूद</u> :**

अ) संस्थेच्या विधानपत्रात (ज्ञापनामध्ये) फेरबदल, वाढ, घट, विस्तार अथवा काही बदल करावयाचा असल्यास संस्था नोंदणी अधिनियम १८६० चे कलम १२ व १२अ मध्ये असलेल्या तरतुदीप्रमाणे करता येईल.

ब) संस्थेच्या नियम व नियमावलीत दुरूस्ती बदल-फेरफार, वाढ, घट, विस्तार अथवा काही बदल करावयाचा झाल्यास वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये मतदाना हक्क असलेल्या एकूण सभासद संख्येच्या ३/५ गणसंख्येने तसा ठराव संमत करावा लागेल. संस्था नोंदणी अधिनियम १८६० चे तरतुदींचे पालन करून आवश्यक बदल करता येतील.

---

**(२५) <u>संस्थेच्या नांवात व उद्देशात बदल करण्याची तरतूद</u> :-**

संस्थेच्या नावात किंवा उद्देशात बदल, वाढ, घट, विस्तार, अथवा काही बदल करावयाचा असल्यास संस्था नोंदणी अधिनियम १८६० चे कलम १२ व १२-अ मध्ये असलेल्या तरतुदीप्रमाणे कार्यवाही करता येईल. वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये संस्थेच्या एकूण सभासद संख्येच्या ३/५ गणसंख्येने तसा ठराव संमत करावा लागेल..

---

**(२६) <u>विसर्जन</u> :-**

जर काही कारणांमुळे संस्था बरखास्त करावयाची झाली तर वरीलप्रमाणे सर्व सभासदांना १० दिवस अगोदर नोटीस देऊन कळविण्यात येईल. याबाबत सुध्दा सर्वसाधारण सभेमध्ये संस्थेच्या एकूण सभासद संख्येच्या ३/५ गणसख्येने तसा ठराव संमत करावा लागेल. संस्थेचे सर्व देणे-घेणेस आर्थिक व्यवहार पुर्ण करावे लागतील संस्थेची स्थावर-जंगम, शिल्लक मालमत्ता नोंदणीकृत संस्थेस दान/देणगी म्हणून दिली जा/ शकते तसेच संस्था नोंदणी अधिनियम १८६० च्या कलम १३ व १४ नुसार कार्यवाही पुर्ण करावी लागेल.

सर्व कायदेशीर सोपस्कार पुर्ण झाल्यावर त्याप्रमाणे संस्थेचे कार्य बंद करता येईल अथवा संस्था विसर्जित करता येईल.

---

// दाखला //

प्रमाणित करणेत येते की,**''विठ्ठलराव पाटील महाविद्यालय माजी विद्यार्थी वेल्फेअर असोसिएशन, कळे, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर''**या संस्थेच्या नियम व नियमावलीची ही सत्यप्रत आहे.

| अ.नं. | पदाधिकाऱ्यांची नांव | हुद्दा | सहया |
|---|---|---|---|
| १) | श्री. विजयकुमार शंकर पाटील<br>रा.सावर्डे तर्फ असंडोली,पो.कळे,ता.पन्हाळा,जि.कोल्हापूर | अध्यक्ष | |
| २) | श्री. सचिन निवृत्ती पाटील<br>रा.चिंचवडे,पो.भामटे,ता.करवीर,जि.कोल्हापूर | उपाध्यक्ष | |
| ३) | श्री. दत्तात्रय हरी नाईक<br>रा.कळे,खडकाव गल्ली,कळे,ता.पन्हाळा,जि.कोल्हापूर | सचिव | |
| ४) | श्री. कृष्णात शामराव शेवाळे<br>रा.वाघुर्डे,पो.कळे,ता.पन्हाळा,जि.कोल्हापूर | खजिनदार | |

अध्यक्ष     उपाध्यक्ष     सेक्रेटरी     खजानिस

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

Scanned by CamScanner